# <u>निशाणी क्र.५ वरील आदेश</u>

१. वादीने सदरचा दावा कायम स्वरूपी मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्यामध्ये वादीने तात्पुरत्या मनाई हुकुमासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये हा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीचे संक्षीप्त कथन पुढील प्रमाणे आहे. मौजे शिवणी ता.किनवट जि. नांदेड येथील शेत गट नंबर ३७५ क्षेत्रफळ २ हे ४० आर ज्याच्या चतुसिमा:

पुर्वेस —इस्लापुरकडे जाणारा रोड, आबादी आणि शिवणी गाव
पश्चिमेस— वनखात्याची जमीन व सरकारी माळ
उत्तरेस— धावजी लालु यांचे शेत
दक्षिणेस — बि ॲन्ड सी ची जमीन

आणि

पुर्वेस —इस्लापुरकडे जाणारा रोड, आबादी आणि शिवणी गाव
पश्चिमेस— वनखात्याची जमीन व सरकारी माळ
उत्तरेस— बि ॲन्ड सी ची जमीन
दक्षिणेस — किसन साधु धावजी राठोड यांचे शेत

(वरील जमीनीस यापुढे दावा जमीन असे संबोधण्यात आले आहे.)

३. दावा जमीनीचा वादी मालक व कब्जेदार आहे. वादीने दिनांक १३.०८.२००३, १७.११.२००३, १९.११.२००३ आणि २८.०२.२००८ रोजी अनुक्रमे खरेदी खत क्रमांक १५०३/२००३, १७३६/२००३, १७४५/२००३, आणि ३९३/२००५ या खरेदी खता आधारे प्रत्येक खरेदी खताने ६० आर जमीन प्रमाणे असे एकुण २ हेक्टर ४० आर विकत घेतलेली आहे. फेरफार क्रमांक ३१७ नुसार हा मंजुर होवुन वादीचे नांव सात बाराच्या महसुली अभिलेखात मालक व कब्जेदार म्हणुन नोंदवीले आहे. वादीच्या एकुण वाद मिळकतीमध्ये बि ॲन्ड सी विभागाची जमीन असल्यामुळे वादमिळकतीचे दोन विभागात विभागणी झालेली आहे.

४. दिनांक २१.१०.२०१८ रोजी वादी त्याच्या कर्मचारी मजुरासह मशागत व

साफसफाई करीत असतांना प्रतिवादीने बेकायदेशीरपणे वादमिळकतीमध्ये येवुन वादीच्या कब्जाला हस्तक्षेप व अडथळा निर्माण केला व अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला. वादीने प्रतिवादीने तसे न करण्याची विनंती केली असता त्यांनी वादीला शिवीगाळी करून धक्का बुक्की केली व जिवे मारण्याची धमकी दिली. प्रतिवादी हे वादीच्या मालकी व ताब्याला हस्तक्षेप करून वादीला बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहेत. प्रतिवादीला कोणताही कायदेशीर हक्क नसतांना ते वादीच्या मिळकतीमध्ये हस्तक्षेप करीत आहेत. म्हणुन हा दावा दाखल करण्यास कारण घडले आहे. वादीची प्रथमदर्शनी केस आहे व न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे आणि जर मनाईहुकूम नाकारल्यास वादीचे कोणतेही पैश्याच्या स्वरूपात भरून न निघणारे नुकसान होईल. म्हणुन हा वादीने अर्ज दाखल केला आहे.

५. प्रतिवादीने निशाणी क्र.१८ वर त्यांचा जबाब दावा दाखल केला आहे. तसेच निशाणी क्र.२२ वर पुरसीस दाखल करून हा जबाब दावा मनाई हुकुमाच्या अर्जासाठी म्हणणे म्हणुन गृहीत धरावे असे न्यायालयास प्रतिवादींनी कळविले आहे. प्रतिवादींनी वादीचे कथने पुर्णत: नाकारली आहेत. त्यांनी वादीची दावा मिळकतीवर मालकी व कब्जेवहीवाटी नाकारलेली आहे. दावा जमीनीच्या चतु:सिमाही नाकारल्या आहेत. त्यांनी वादीच्या दाव्या जमीनीत हस्तक्षेप करण्याची बाबही नाकारली आहे. पुढे प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वादी हा भुमाफीया आहे व त्याचा प्लॉटींगचा व्यवसाय आहे. मौजे शिवणी येथे मागील साठ ते सत्तर वर्षापासुन मुस्लीमाची 'ईदगाह नमाज' पठन करण्याची सर्वे नंबर ३९६ क्षेत्र ३० आर जमीन आहे. त्या जमीनीवर वादी अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. सदरील जमीन धार्मीक कार्यासाठी उपयोगात आहे. मुस्लीम धर्मानुसार वर्षातुन दोन वेळा सामुहीक नमाज अदा केली जाते. याचा गैरफायदा घेवुन वादी या जमीनीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि त्यामुळे शिवणी येथे दोन समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. वादीला शिवणी येथील सर्वधर्मीय लोकांनी अतिक्रमण न करण्याची विनंती केली आहे. परंतु वादी ईदगाहच्या जमीनीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी हा भुमाफीया आहे व त्याने पुर्ण तालुक्यात अनेक जमीनी खरेदी करून घेतल्या आहेत व वादी

श्रीमंत व राजकीय व्यक्ती असुन त्याचा फायदा घेवुन तो मौजे शिवणी येथील ईदगाहच्या जमीनीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रतिवादीची स्वतःची जमीन वादमिळकतीला लागुन नाही त्यामुळे प्रतिवादींनी वाद मिळकतीवर कब्जा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वादी मनाई हुकुमाद्वारे ईदगाहच्या जमीनीवर अतिक्रमण करण्याच्या तयारीत आहे. शेवटी प्रतिवादींनी दावा नांमजुर करण्याची विनंती केलेली आहे.

६. वादीने अर्जाच्या पृष्टयार्थ स्वतःचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे दावा जमीनीचे सात बाराचे उतारा व वर उल्लेखीत चार खरेदी खताच्या नक्कला आणि मौजे शिवणी गावचा गाव नकाशाची प्रत दाखल केलेली आहे. याउलट प्रतिवादीने ३९६ गट नंबरचा टोच नकाशा, गट नंबर ३९६ चा सात बारा, जुना सर्वे नंबर ३९६ चा सात बाराचा उतारा दाखल केलेला आहे.

७. मी अभिलेखाचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे वादी तर्फे विद्वान विधीज्ञ डि.जी.काळे यांचा आणि प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री टि.एच.कुरेशी यांचा युक्तीवाद ऐकला.

८. या आदेशाच्या योग्य न्याय निर्णयासाठी मी खालील मुद्दे निर्धारीत करून त्यावर माझा निष्कर्ष खालील दिलेल्या कारणास्तव नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय? | नाही |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने जातो काय? | नाही |
| ३ | अर्ज नामंजुर केल्यास वादीची अपरीमीत हाणी होईल काय? | नाही |
| ४ | आदेश काय? | अर्ज नामंजुर करण्यांत येतो |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ :**

९. वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असुन मी पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीत चर्चेसाठी घेत आहे.

१०. वादीचे म्हणण्यानुसार तो दावा मिळकतीचा मालक व कब्जेदार आहे. त्यांनी दावा मिळकत नोंदणीकृत खरेदी खताआधारे विकत घेतलेली आहे. वादीने दाखल केलेले त्याचे चार खरेदी खत क्रमांक १५०२/२००३, १७३६/२००३, १७४५/२००३ आणि ३९३/२००५ या खरेदी खतांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की वादीने प्रत्येक वेळी ६० आर एवढा तुकडा खरेदी केलेला आहे. खरेदी खत क्रमांक १५०२/२००३ मध्ये एकाच ६० आर तुकडयाच्या दोन वेगवेगळया चतु:सिमा खरेदी खतामध्ये लिहिलेल्या आहेत. वादीने दाव्यातही दावा जमीन ही वेगवेगळया दोन विभागात विभागली गेलेली असुन त्याच्या वेगवेगळया दोन चतु:सिमा लिहिलेल्या आहेत.

११. याउलट प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी हा मौजे शिवणी येथील मुस्लीम समाजाची ३९६ ची ३० आर ची ईदगाहची जमीनीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रतिवादीने दाखल केलेल्या टोच नकाशाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सर्वे नंबर ३९६ हा गट नंबर ३९५ मधीलच भाग आहे आणि गट नंबर ३९६ च्या पुर्व, पश्चिम आणि उत्तर बाजुला गट नंबर ३९५ आहे. वरील बाब वादीने दाखल केलेल्या गाव नकाशावरूनही दिसुन येते. गट नंबर ३९६ हा गट क्रमांक ३९५ मध्ये घुसलेला आहे. गट क्रमांक ३९६ च्या तिनही बाजुने गट क्रमांक ३९५ आहे. असे असताना अपेक्षीत आहे की वादीच्या एका तरी खरेदी खतामध्ये ३९६ ची चतु:सिमा असणे आवश्यक होते. परंतु तसे दिसुन येत नाही.

१२. प्रतिवादींनी कागदपत्राची यादी निशाणी क्र.२१ अनुक्रमांक ३ नुसार सर्वे नंबर ३९६ चा सात बारा उतारा अभिलेखावर दाखल केलेला आहे. हा सात बारा १९८७–८८ सालापासुन ते १९९८–९९ पर्यंतचा आहे. या सात बाराचे अवलोकन केले असता असे

दिसुन येते की, सर्वे नंबर ३९६ हा पुर्ण ३० आर क्षेत्रफळाचा आहे आणि त्या क्षेत्रफळावर मालक व ताबेदार म्हणुन **''नमाज ईदगाह''** अशी नोंद आहे. ताबाधारकाच्या स्तंभामध्येही कब्जेदार म्हणुन ''नमाज ईदगाह'' ची नोंद आहे. म्हणजेच गट नंबर ३९५ मध्येच ३० आर क्षेत्रफळाचा एक नवीन सर्वे नंबर ३९६ नमाज ईदगाह या जागेसाठी तयार केलेला आहे. गट नंबर ३९६ वर साल १९८७ च्या पुर्वीपासुन ईदगाह नमाज असल्याचे सात बारा अभिलेखावरून दिसुन येते.

१३. प्रतिवादींचा दावा मिळकतीमध्ये कोणताही वैयक्तीक हितसंबध नाही. गट क्रमांक ३९६ च्या सात बारा उता—यावर १९८७ पासुन ३० आर क्षेत्रफळावर ''नमाज ईदगाह'' अशी नोंद आहे. असे असतांनाही नमाज ईदगाह बद्दल वादीने दाव्यामध्ये कोणतेही कथन केलेले नाही. म्हणजेच वादीने महत्वाची बाब लपवुन ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१४. ईदगाह ही जागा मुस्लीम धर्मीयांची ईदच्या दिवशी नमाज पठनाची जागा आहे. मुस्लीम धर्मीयांचे लोक वर्षातुन दोन वेळा ईदगाहवर नमाज पठन करतात. मुस्लीम समाजाची त्या जागेवर १९८७ पासुन ताबा असल्याचे सात बारा उता—यावरून दिसुन येते. नमाज ईदगाहची जागा कोण्या एखादया विशीष्ट खाजगी व्यक्तीची मालकीची नाही. त्या जागेवर त्या परिसरातील सर्व मुस्लीम धर्मीयांच्या लोकांचा अधिकार असतो आणि त्या लोकांचा त्या जागेशी हितसंबध असतो. असे असतांना वादीने केवळ पाच व्यक्तींच्या विरूध्द हा दावा आणलेला आहे. वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १ नियम ८ नुसार प्रातीनिधीक दावा (Representative suit) आणणे आवश्यक होते. त्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १ नियम ८(२) नुसार त्या परिसरातील सर्व जनतेला जाहीर नोटीसही काढणे आवश्यक होते. परंतु केवळ काही व्यक्तींनाच, ज्यांचा वाद मिळकतीशी काहीही वैयक्तीक हितसंबध नसतांना, प्रतिवादी म्हणुन समाविष्ठ करून हा दावा दाखल केलेला आहे.

१५. अभिलेखावरील कथनावरून आणि सर्व कागदपत्रावरून प्रथमदर्शी असे

दिसुन येते की, वाद मिळकतीच्या चतु:सिमेबद्यल आणि वाद मिळकतीच्या ओळखीबद्दल वाद आहे. गट क्रमांक ३९६ हा पुर्ण ''नमाज ईदगाह'' चा असल्यामुळे आणि हा गट क्रमांक पुर्णत: गट क्रमांक ३९५ मध्येच असल्यामुळे आणि गट क्रमांक ३९६ च्या तिनही बाजुने गट क्रमांक ३९५ असल्यामुळे ही शक्यता नाकारता येत नाही की, नमाज ईदगाहच्या जमीनीवरच अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. म्हणुन वरील सर्व कारणमीमांसेवरून मी या निष्कर्षास आलेलो आहे की वादीची प्रथमदर्शनी केस नाही. परिणामी अनुतोषाचा कल आणि पैश्याचा स्वरूपात भरून न निघणारे नुकसान या मुद्याचा प्रश्न निर्माण होत नाही. म्हणुन मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोदवुन मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज निशाणी क्र.५ नामंजुर करण्यांत येतो.

२. खर्चाचा आदेश मुख्य दाव्या सोबत.

स्वाक्षरीत/—
( जहागीर र.पठाण )
दिवाणी न्यायाधीश,क.स्तर किनवट

दिनांक :— २४.०४.२०१९
स्थळ :— किनवट